दै. "अॅग्रोवन" दि. 31/8/2021.

शेतमाल तारणातून २७ कोटी कर्जवाटप

सुनील पवार : दोन हजार शेतकऱ्यांना योजनेचा लाभ

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : कृषी पणन मंडळाद्वारे बाजार समित्यांद्वारा राबविण्यात येणाऱ्या शेतमाल तारण योजनेत १५ जुलै अखेर ६१ बाजार समित्यांद्वारे १ लाख २९४ क्विंटल शेतमाल तारणातून २ हजार शेतकऱ्यांना २७ कोटी ५७ लाखांचे कर्ज वितरण करण्यात आले, अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी दिली.

याबाबतची माहिती देताना पवार म्हणाले, की शेतमाल काढणीच्या हंगामात बाजार समित्यांमध्ये अचानक होणाऱ्या आवकेमुळे शेतमालाचे दर कोसळतात. यामध्ये शेतमालाचा दर्जा चांगला असून देखील चांगले दर न मिळाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी बाजार समित्यांद्वारा १९९० पासून शेतमाल तारण योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेमध्ये ६ टक्के व्याजदराने शेतमालाच्या किमतीच्या ७५ टक्के रक्कम दिली जाते. यावर्षीच्या (२०२०-२१) हंगामात सोयाबीनला चांगला दर मिळत असून, भाताला राज्य सरकारने दिलेल्या बोनसमुळे शेतकऱ्यांकडून अल्पप्रतिसाद मिळाला असला तरी, १ लाख २९४ शेतमाल ताणातून शेतकऱ्यांना २७ कोटी ५७ लाखांचे कर्ज वितरण करण्यात आले आहे.''

यावर्षीच्या तारण योजनेद्वारे तुरीमध्ये प्रति क्विंटल ६०० ते २ हजार, सोयाबीनमध्ये १ हजार २०० ते ३ हजार ६२५, हळदीमध्ये सरासरी १ हजार ५०० रुपयांचा फायदा मिळाला आहे. तर हरभऱ्यामध्ये ७०० रुपयांपर्यंत वाढ मिळाली आहे, असेही पवार यांनी सांगितले.



या शेतमालाचा योजनेत समावेश

तूर, मुग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, चना, धान, करडई, ज्वारी, मका, गहू, घेवडा, काजू बी, बेदाणा, सुपारी, हळद

गेल्या चार वर्षांतील योजनेची स्थिती

वर्ष	बाजार समिती संख्या	शेतकरी संख्या	शेतमालाचे वजन	शेतमालाची किंमत	कर्ज रक्कम
२०१७-१८	१३५	५,३९५	२,१४,६१८	७१ कोटी ७ हजार	४४ कोटी ४१ लाख
२०१८-१९	१४७	१०,४६८	४, ४०,८३९	१३५ कोटी ३७ लाख	९२ कोटी ७४ लाख
२०१९-२०	९६	३, ८३७	१, ७५,६९४	५४ कोटी ९२ लाख	३८ कटी २० लाख
२०२०-२१	६१	२,०७०	१,००,२९४	३८ कोटी २० लाख	२७ कोटी ५७ लाख

दै. "अॅग्रोवन" दि. ८।८।२०२१.

कृषी व अन्नप्रक्रियेसाठी स्वतंत्र संचालनालय स्थापन

कृती गटाच्या स्थापनेसह 'महाराष्ट्र ब्रँड' विकसित होणार

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्य अन्न प्रक्रिया धोरणानुसार कृषी आयुक्तालयात आता स्वतंत्रपणे 'कृषी व अन्नप्रक्रिया संचालनालय' स्थापन करण्यात आले आहे. कृषी विभागाचे उपसचिव हे. गो. म्हापणकर यांनी संचालनालय स्थापनेबाबत शासन निर्णय जारी करताना एक कृती गट देखील स्थापन करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. कृषी व संलग्न उत्पादनांची प्रक्रियेद्वारे मूल्यसाखळी तयार करून 'महाराष्ट्र ब्रँड' विकसित करण्यासाठी कृतिगट काम करणार आहे.

या संचालनालयास संनियंत्रण व देखरेख नियामक मंडळ स्थापन होणार आहे. त्याचे अध्यक्षपद कृषिमंत्र्यांकडे देण्यात आले आहे. अन्न प्रक्रिया प्रकल्पांना मंजुरी देणे व मूल्यमापनासाठी राज्यस्तरावर एक स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्षपद मात्र कृषी आयुक्तांना देण्यात आले आहे. स्मार्ट, पोकरा, गटशेती, एसएफएससी, जैविक शेती अभियान, फलोत्पादन अभियान, आरकेव्हीवाय, मॅग्नेट, किसान संपदा, ऑपरेशन ग्रीन, अशा सर्व योजना आता संचालनालयाच्या अखत्यारित राबविल्या जाणार आहेत.

संचालनालय नेमके काय करणार

- केंद्र व राज्य शासनाच्या योजना कृषी व अन्न प्रक्रिया योजनांची अंमलबजावणी
- उद्योगांसाठी एक खिडकी व्यवस्था
- विकेल ते पिकेल अभियानासाठी योजनांची सांगड घालणे
- उत्पादनांचा महाराष्ट्र ब्रॅण्ड विकसित करणे

संचालनालयामुळे काय बदल होणार

- कृषी आयुक्तालयातील कृषी प्रक्रिया व नियोजन विभागाचा संचालक पूर्णवेळ संचालनालय सांभाळणार
- संचालक कक्ष व कृषी प्रक्रिया शाखा आता संचालनालयाच्या अखत्यारित राहील
- नियोजन शाखा, संनियंत्रण व मूल्यमापन शाखा काम करतील
- राज्यस्तरीय सामुहिक फळप्रक्रिया व प्रक्रिया प्रशिक्षण केंद्र अखत्यारित येणार
- कृषी निर्यात कक्षदेखील संचालनालयाशी संलग्न असेल
- प्रत्येक जिल्ह्यातील एसएओ कार्यालयात संचालनालयासाठी स्वतंत्र तंत्र अधिकारी

दै. "अग्रोवन" दि. 5/8/2021.

कृषी निर्यातीसाठी १४ नवी केंद्रे

पंधरा ऑगस्टपासून ही केंद्रे कार्यान्वित करण्याच्या सूचना

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्याच्या फळे व भाजीपाला निर्यातीला चालना देण्यासाठी १४ जिल्ह्यांमध्ये 'कृषिमाल निर्यात मार्गदर्शन केंद्र' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात तातडीने या केंद्रांची उभारणी करावी. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री किंवा इतर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत केंद्रांचे उद्घाटन करावे आणि शेतकऱ्यांना निर्यातविषयक मार्गदर्शन सेवा सुरू करावी, अशा सूचना राज्यातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. देशातील कृषी निर्यात वाढविण्यासाठी स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. त्यामुळे २०१८ मध्ये केंद्र सरकारने कृषिमाल निर्यातीचे नवे धोरण जाहीर केले.

पान ४ वर »

शेतकरी केंद्रबिंदू

"सर्वसामान्य शेतकरी आमच्या केंद्रांचा केंद्रबिंदू राहील. मात्र इतर उद्योजक तसेच राज्यात स्थापन होत असलेल्या फळे व भाजीपाला गटातील विविध उत्पादक कंपन्यांनादेखील आम्ही मार्गदर्शन करू. निर्यातक्षम मालाचे उत्पादन, कीड व रोगमुक्त मालाच्या निर्यातीत वृद्धी आणि शेवटी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये निर्यातीद्वारे समृद्धी आणणे हा या केंद्रांचा हेतू असेल," अशी माहिती फलोत्पादन विभागाच्या सूत्रांनी दिली.

कृषी निर्यातीसाठी १४ नवी केंद्रे

» पान १ वरून

इतर राज्यांपेक्षा शेतमाल निर्यातीत गेल्या दोन दशकांपासून अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रानेदेखील २०१९ मध्ये निर्यातीचे नवे धोरण लागू केले. अर्थात, धोरण आले तरी क्षेत्रीय पातळीवर मोठे बदल अद्यापही दिसून आलेले नाहीत.

राज्याला कृषी निर्यात धोरण असले तरी सामान्य शेतकऱ्यांना या धोरणाची सोप्या भाषेत माहिती देणारे तसेच प्रत्यक्ष निर्यातीसाठी मार्गदर्शन करणारी स्वतंत्र यंत्रणा तालुका सोडाच; पण जिल्हास्तरावरदेखील उपलब्ध नाही. कृषी आयुक्तालयाने या समस्येचा अभ्यास करीत आता या कामासाठी जिल्हास्तरावर स्वतंत्र कक्ष तयार करण्याचा करण्याचा निर्णय घेतला आहे. फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांच्याकडून या संकल्पनेवर काम सुरू आहे.

निर्यात मार्गदर्शनासाठी नेमके काय केले जात आहे?

- **निर्यात केंद्रांचे जिल्हे :** नागपूर, अमरावती, जालना, सातारा, लातूर, नगर, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी, ठाणे, पुणे, सोलापूर, सांगली, नाशिक
- **कुठे असेल केंद्र :** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात
- **कोणाकडे समन्वयाची जबाबदारी :** सध्या निर्यातीचे कामकाज हाताळणारे कृषी उपसंचालक
- **मार्गदर्शन कोण करणार :** उपसंचालकांच्या अखत्यारित स्वतंत्र कृषी अधिकारी
- **केंद्र कोणासाठी असेल :** शेतकरी, उद्योजक, निर्यातदार, व्यावसायिक, शेतकरी उत्पादक कंपन्या व संस्था
- **कोणते मार्गदर्शन मिळेल :** निर्यात कार्यपद्धती, पॅकिंग-ग्रेडिंगचे नियम, विदेशातील अटी-नियमावली, केंद्र व राज्य शासनाची नियमावली

दै. "सकाळ" दि. ११/८/२०२१.

सकाळ

पुणे, बुधवार, ११ ऑगस्ट २०२१

राज्यात दोनशे 'कॉपशॉप' उभारणार

शेतमालाचे ब्रॅण्ड पॅकेजिंग; ग्राहकांना वाजवी दरात दर्जेदार शेतमालाचा पुरवठा

सकाळ EXCLUSIVE

अनिल सावळे : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १० : शेतमालाची विक्री व्यवस्था बळकट करण्यासाठी सहकार विकास महामंडळामार्फत राज्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी दोनशे कॉपशॉप (सहकार दुकान) उभारण्यात येणार आहेत. 'कॉपशॉप'च्या माध्यमातून शेतमालाला बाजारपेठ मिळण्यासोबत ग्राहकांना वाजवी दरात दर्जेदार शेतमाल उपलब्ध होणार आहे.

"शेतकरी उत्पादक कंपनी आणि सहकाराच्या माध्यमातून शेतकरी केंद्रबिंदू मानून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे. या योजनेमुळे ग्राहकांना शेतमाल वाजवी किमतीमध्ये मिळणार असून, शेतकरी कंपन्यांना हक्काची विक्री व्यवस्था उपलब्ध होईल.
- बाळासाहेब पाटील, सहकार व पणनमंत्री

सहकार विकास महामंडळांतर्गत राज्यात सुमारे दोन लाख नोंदणीकृत संस्था आहेत. त्यामध्ये गृहनिर्माण संस्था, अर्बन बँका, पतसंस्था, शेतकरी उत्पादक कंपनी आणि महिला बचत गटांचा समावेश आहे. 'कॉपशॉप' सुरू करण्यासाठी किमान दोनशे चौरस फुटांपर्यंत जागा असणे आवश्यक आहे. माल ठेवण्यासाठी मांडणी, संगणक, प्रिंटर अशी साधने स्वखर्चाने आणावी लागतील. त्यासाठी सुमारे एक लाख रुपये गुंतवणूक कंपनीला करावी लागणार आहे.

शेतकरी उत्पादक कंपन्या स्वस्त दरात शेतीमाल एकमेकांना उपलब्ध करून देतील. हा शेतीमाल 'कॉपशॉप'पर्यंत पोचविण्याचा खर्च महामंडळ करणार आहे. कंपन्यांना उत्पादनाच्या विक्रीतून २० ते ३० टक्के नफा मिळावा असा महामंडळाचा प्रयत्न आहे. शेतीमालाचा दर्जा आणि दर ठरविण्यासाठी महामंडळाने स्वतंत्र समिती स्थापन केली आहे. तसेच, ग्रामीण कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन संचालनालयासोबत संयुक्त करार झाला आहे. त्यामुळे कृषी पर्यटन केंद्रचालकांनाही आर्थिक सक्षम बनविण्यासाठी योजनेचा लाभ होणार आहे. याबाबत महामंडळाकडून शेतकरी आणि युवकांना प्रशिक्षणही देण्यात येणार असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद आकरे यांनी दिली.

खत कंपन्यांसोबत करार

शेतकऱ्यांना माफक दरात खते देण्यासाठी महामंडळामार्फत 'कृषी निविष्ठा विक्री व्यवस्थापन' उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत इफ्को, आरसीएफ, दीपक फर्टिलायझर्स, स्मार्टकेम, झुआरी ॲग्रो केमिकल्स, कोरोमंडल फर्टिलायझर्स, कृभको, इंडियन पोटॅश या कृषी निविष्ठा उत्पादक कंपन्यांसमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. यंदाच्या खरीप हंगामामध्ये महामंडळामार्फत २० हजारांहून अधिक शेतकऱ्यांना खतांचा पुरवठा करण्यात आला आहे.

'कॉपशॉप'चे पुणे मॉडेल

पुण्यात प्रायोगिक तत्त्वावर साखर संकुलसह सात 'कॉपशॉप' सुरू करण्यात आली आहेत, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे 'कॉपशॉप'चे हे पुणे मॉडेल आता राज्यभरात विकसित करण्यात येणार आहे.

दै. "महाराष्ट्र टाईम्स"
दि. २३।८।२०२१.

बाजार समित्यांसाठी अनुदान योजना

पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राज्यातील बाजार समित्या बळकट व्हाव्यात आणि त्याचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा. आगामी काळात बाजार समित्या बळकट करण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यानुसार अनुदान योजना राबविण्यात येणार आहेत,' अशी माहिती सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील राज्य बाजार समिती कर्मचारी संघाच्या नूतन कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

पणन संचालक सतीश सोनी, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड आदी उपस्थित होते. या वेळी बोलताना बाळासाहेब पाटील म्हणाले, 'भाजीपाला, फळांवर प्रक्रिया करण्यासाठी विविध उपाय योजना करण्यात येणार आहेत; तसेच लिलाव गृह, गोदाम, धान्य चाळणी यंत्र, पॅक हाउस, शीतगृहांसारख्या विविध योजना राज्यात राबविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल आता थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे काम 'पणन' अंतर्गत सुरू करण्यात आले आहे. या उपक्रमाला राज्यात चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळाल्याने यश मिळाले आहे.'

'राज्यातील बाजार समित्या बळकट झाल्या पाहिजेत. त्यांच्यात सुधारणा झाली पाहिजे, हा यामागचा प्रमुख उद्देश आहे. बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी पणन विभाग कार्यवाही करत आहे. राज्यातील अनेक बाजार समित्यांना जागा कमी पडत आहे. अनेक ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाची गरज आहे,' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

'राज्य अनुदान योजनेच्या माध्यमातून रूफ टॉप सोलर वीजनिर्मिती प्रकल्प, शेतमाल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा, पेस्टिसाइड रेसिड्यू परीक्षण प्रयोगशाळा, इलेक्ट्रोनिक वजन काटे, ग्री क्लिनिक पिकवण गृह ग्रेडिंग व वॅक्सिंग युनिट, व्यावसायिक गाळे व दुकाने बांधकाम यासह विविध प्रकल्प राबविले जाणार आहेत,' असेही त्यांनी सांगितले.

दै. "अॅग्रोवन" दि. १३।८।२०२१.

उत्पन्नवाढीसाठी उपाययोजना करा

पणनमंत्र्यांच्या बाजार समित्यांना सूचना

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : फळे भाजीपाला नियमनमुक्ती, केंद्र सरकारचे नव्याने येऊ घातलेले कृषी आणि पणन कायद्यांच्या पार्श्वभूमीवर बाजार समित्यांचे घटणारे उत्पन्नामुळे, उत्पन्नवाढीसाठी नव्याने पर्यायी उपाययोजना करा, अशा सूचना पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिल्या. पणन संचालनालयाने केलेल्या कृती आराखड्यावर मंत्री बाळासाहेब पाटील यांनी मंत्रालयात आढावा बैठक घेतली.

बैठकीला पणन विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, उपसचिव का. गो. वळवी, पणन संचालक सतीश सोनी, सहसंचालक विनायक कोकरे आदी अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती आणि बळकटीकरण, विक्रीयोग्य उत्पादनांच्या प्रभावी हाताळणी आणि व्यवस्थापनासाठी विपणनाच्या पायाभूत सुविधांचा विकास, शेतीमालाची साफसफाई, प्रतवारी करून तात्पुरती साठवणूक, फळे, भाजीपाला व फुले यांसारख्या नाशीवंत मालांचे आयुष्य व दर्जावाढ, काढणीपश्चात आणि आणि हाताळणीदरम्यान होणारे नुकसान कमी करून अंतिमत: शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ करणे, बाजार समितीसाठी नविन उत्पन्नाचे स्रोत निर्मिती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

दै. "पुढारी" दि. 23/8/2021.

www.pudhari.com

'पणन'च्या सुविधा केंद्रांवर शेतमाल प्रक्रियेत वाढ

सहामाहीत १०२ कोटींची शेतमाल निर्यात; दुसऱ्या लाटेतही प्रक्रियेत वाढ

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाची दुसरी लाट असूनही गेल्या सहा महिन्यांमध्ये राज्य कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रांवर सुमारे १४ हजार ४१५ मे. टन शेतमालावर प्रक्रिया करण्यात आली आहे, जी गतवर्षी १२ हजार ६६० मे. टन होती. याचा विचार करता १ हजार ७५५ मे. टन जादा शेतमालावर प्रक्रिया करण्यात आली आहे.

सुविधा केंद्रांच्या वापरातून गतवर्षी पहिल्या सहामाहीतील शेतमालाची देशांतर्गत विक्री व निर्यातीचे एकूण मूल्य १०५ कोटी ९७ लाख रुपये होते. ते चालू वर्षी १०२ कोटी ९ लाख रुपये असल्याचे मंडळाकडून सांगण्यात आले.

पणन मंडळामार्फत फळे व भाजीपाल्याची निर्यात व देशांतर्गत बाजारपेठेत विपणनाच्या दृष्टीने अद्ययावत सुविधांनी युक्त अशा ४४ निर्यात सुविधा केंद्रांची निर्मिती केलेली आहे. सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, पणन राज्यमंत्री शंभूराजे देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सुविधा करण्यात आल्या आहेत.

सुविधा केंद्रांमधून निर्यात होणाऱ्या कृषी मालामध्ये द्राक्षे, कांदा, केळी, आंबा, भाजीपाला, फळे, पशुखाद्य, लिंबू, आटा, सुजी, मैदा व हिरवी मिरची यांचा समावेश आहे. मालाचे प्रीकूलिंग, शीतगृह साठवणूक, पॅकिंग, प्रतवारी केली जाते. आयातदार देशांच्या मानकांनुसार त्यावर विविध प्रक्रिया केल्या जातात. विकिरण, व्हेपर हीट ट्रीटमेंट, हॉट वॉटर ट्रीटमेंट आदींचा वापर केला जातो. शेतमाल निर्यात युरोप, दुबई, इराण, श्रीलंका, थायलंड, रशिया, इंग्लंड, युरोपियन देश, ऑस्ट्रेलिया, कतार, जपान, सिंगापूर, कॅनडा, अमेरिका, नेदरलँड, जर्मनी व नेपाळ या देशांना झालेली आहे.

> निर्यात सुविधा केंद्रांच्या उपलब्धतेत देशात राज्य कृषी पणन मंडळ अग्रेसर आहे. या सुविधांचा उपयोग कृषी मालाच्या निर्यातीसोबतच स्थानिक विक्रीकरिता प्राथमिक प्रक्रिया, कुशल व अकुशल रोजगारनिर्मिती, सुविधांचा पथदर्शक म्हणून वापर, गुणवत्तापूर्ण मालाची निर्यात, नवनवीन देशांना निर्यातीस होतो. खासगी निर्यातदारांचा अशा प्रकारच्या सुविधा उभारणीकरिता वाढता सहभाग दिसून येत आहे. याकरिता मंडळाच्या सुविधांचा वापर शेतकरी, शेतकरी गट, सहकारी संस्था, निर्यातदार, उद्योजकांनी केला पाहिजे.
>
> - सुनील पवार, कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

निर्यात सुविधा केंद्रांवर शेतमालावर करण्यात येत असलेली प्रक्रिया.

दै. "लोकमत"
दि. १४/८/२०२१.

निर्यात केंद्रांतून १४ हजार मेट्रिक टन शेतमालाचे वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोना काळातही कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधा केंद्रांमधून १४ हजार ४१५ मेट्रिक टन शेतमालाची हाताळणी केली. यात द्राक्ष, आंबा, फळांपासून ते हिरवी मिरची व अन्य भाज्यांचाही समावेश आहे.

कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार यांनी ही माहिती दिली. शेतीमालाचे परदेशात व देशांतर्गत बाजारपेठेत वितरण होण्यासाठी पॅकिंगसह अनेक आवश्यक गोष्टी कराव्या लागतात. बाजारपेठा, तेथील दर वगैरेची अद्ययावत माहिती त्यांना द्यावी लागते. त्यासाठी मंडळाने राज्यात ४४ निर्यात सुविधा केंद्र सुरू केली आहेत. या केंद्रांचे काम कोरोना काळातही सुरू होते, असे पवार यांनी सांगितले.

केंद्रांमधून युरोप, दुबई, इराण, श्रीलंका, थायलंड, रशिया, इंग्लंड,

युरोपियन देश, ऑस्ट्रेलिया, कतार, जपान, सिंगापूर, कॅनडा, अमेरिका, नेदरलँड, जर्मनी व नेपाळ या देशांना निर्यात होते. देशातील पंजाब, उत्तर प्रदेश, गुजरात, दिल्ली या राज्यांमध्येही शेतमाल वितरित होतो. मालाची वितरित करण्यापूर्वीची सर्व काळजी सुविधा केंद्राकडून घेतली जाते. यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारही निर्माण होतो, अशी माहिती पवार यांनी दिली.

दै. "सकाळ" दि. १४/१२/२०२३.

बाजार समित्यांना मिळणार बळकटी

पाटील यांची माहिती; लिलाव, गोदाम, शीतगृहासाठी विविध योजना

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १३: "राज्यातील बाजार समित्या बळकट करण्यासाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटी रुपयांची घोषणा केली आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा हा त्या मागचा उद्देश आहे. त्यानुसार अनुदान योजना राबविल्या जाणार आहेत. यामुळे भाजीपाला व फळांवर प्रक्रिया करण्यासाठी विविध उपाय योजना करणार आहेत. तसेच लिलाव गृह, गोदाम, सायलो, धान्य चाळणी यंत्र, पॅक हाऊस, शितगृह यासह विविध योजना राबविल्या जाणार आहेत," असे सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील सांगितले.

"बाजार समितीच्या बळकटीकरणासाठी पणन विभाग कार्यवाही करत आहे. राज्यातील अनेक बाजार समित्यांना जागा कमी पडत आहे. अनेक ठिकाणी नवीन इमारतीच्या बांधकामाची गरज आहे. अशा विविध गोष्टींची त्यामध्ये समयुक्तता करण्यात येणार आहे.
- बाळासाहेब पाटील, सहकार व पणनमंत्री

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पान बाजार आवारातील महाराष्ट्र राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे यांच्या नूतन कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.पणन संचालक सतीश सोनी, कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, बाजार समितीचे प्रशासक मधुकांत गरड यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

पाटील म्हणाले, "शेतकऱ्यांनी पिकवलेला शेतमाल ग्राहकापर्यंत पोहोचण्याचे काम पणन अंतर्गत सुरू आहे. त्याला चांगल्या प्रकारे यश मिळाले आहे. ही तरतूद करताना राज्यातील बाजार समित्या बळकट झाल्या पाहिजे. त्यांच्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे हा यामागचा प्रमुख उद्देश आहे."

दरम्यान, केंद्र शासनाच्या अग्री इन्फ्रा फंड योजना अंतर्गत ३ टक्के व्याज सवाल राज्याच्या योजनेशी जोडण्याचा ही विचार सुरू आहे.

अनुदान योजनेद्वारे हे प्रकल्प राबविणार

१. रुफ टोप सोलार वीजनिर्मिती
२. शेतमाल गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा
३. पेस्टिसाइड रेसिड्यू परीक्षण प्रयोगशाळा
४. इलेक्ट्रॉनिक वजन काटे
५. ग्री क्लिनिक पिकवण गृह ग्रेडिंग व वॅक्सिंग युनिट
६. व्यावसायिक गाळे व दुकाने बांधकाम

दै. "अमोवन" दि. १५।८।२०२१.

संत्रा निर्यातीसाठी विविध देशांमध्ये होणार चाचपणी

अमरावती : जागतिक स्तरावरील संत्रा निर्यातदार देशांच्या स्पर्धेत नागपुरी संत्र्याचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याकरिता कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांवर इंडो-बांगला ऑरेंज असोसिएशनच्या पहिल्याच बैठकीत चर्चा झाली. त्यासोबतच या नव्या संघटनेची नोंदणी आणि कार्यकारिणीदेखील जाहीर करण्यात आली.

वरुड येथील एमकेसी संत्रा प्रक्रिया केंद्रावर ही बैठक पार पडली. मध्य प्रदेश, राजस्थान, विदर्भ या भागांतील पांढुर्णा, सौंसर, झालावाड, वरुड, मोर्शी या संत्रा उत्पादकपट्ट्यातील निर्यातदारांची या बैठकीला उपस्थिती होती. ऑल इंडिया इंडो-बांगला एक्स्पोर्टस असोसिएशन असे यापूर्वीच्या निर्यातदार संघटनेचे नाव होते. त्यात बदल करून इंडो-बांगला ऑरेंज असोसिएशन अशी नव्याने नोंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संघटनेची संस्थापक कार्यकारिणीदेखील ठरली. त्यामध्ये सोनू खान (अध्यक्ष), ताज खान मजनेखान (उपाध्यक्ष), श्रमजीवी नागपुरी संत्रा उत्पादक कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश जिचकार (सचिव), तर संचालकांमध्ये पुरुषोत्तम लकडे, सतीश बोडखे (मध्य प्रदेश), भोरू (राजस्थान), राजीक कुरेशी यांचा समावेश आहे.

संघटनेत सहभागी होणाऱ्यांकरीता ५१०० रुपये नोंदणी शुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. इजिप्त, ऑस्ट्रेलिया, दक्षीण आफ्रिका, चीन या देशांतून पाकिस्तानमध्ये संत्रा निर्यात केली जात आहे. भारतीय संत्र्याची मागणी कमी व्हावी याकरिता चीनकडून प्रयत्न होत आहेत.

या स्पर्धेत नागपुरी संत्र्याचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यावर या वेळी चर्चा झाली. त्याकरिता नागपुरी संत्र्याचा दर्जा सुधारण्यासोबतच आकर्षक पॅकिंग व इतर बाबींवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांच्या बागेची खरेदी केव्हाही केली, तरी १०-१५ सप्टेंबरच्या पुढे फळांची काढणी करून त्यानंतरच निर्यात करण्याचे बैठकीत ठरले. या काळात फळात गोडवा वाढण्यास सुरुवात होते. त्यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी काढणीचा कालावधी निश्चित करण्यावर सहमती झाली.

बांगलादेश सरकारसोबत करणार चर्चा

बांगलादेशने आयातशुल्कात वाढ केली आहे. ती कमी करावी याकरिता एस. जयशंकर, वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याशी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्फत पाठपुरावा केला जात आहे. भारताचे बांगलादेशमधील राजदूत विक्रम दोराईस्वामी यांनी बांगलादेशचे वाणिज्यमंत्री ए. एच. कमलमुस्तफा यांच्यासोबत या विषयावर चर्चा केली. २९ जून २०२१ रोजी बांगलादेश लोकसभेत याला मंजुरी मिळाली. तरीसुद्धा भारतीय शेतकरी हिताचा व्यापक विचार करून निर्णय घेणार असल्याचे कमलमुस्तफा यांनी भारतीय राजदूताला सांगितले.

अशी झाली वाढ

३१ टका (२७ रुपये) वरून ३८.९० टका (३१ रुपये) अशी वाढ आयातशुल्कात करण्यात आली आहे. दीड ते २ लाख टन संत्रा बांगलादेशलाच निर्यात होतो. त्यामुळे बांगलादेश हाच नागपुरी संत्र्याचा मुख्य निर्यातदार आहे.

दै. सकाळ दि. २८/८/२०२१.
(बारामती आवृत्ती).

बारामतीमध्ये फळे, भाजीपाला हाताळणी केंद्राचे आज भूमिपूजन

बारामती, ता. २७ : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे भूमिपूजन, बाजार समिती वजनकाटा उद्घाटन तसेच पेट्रोल टँकरचे पूजन असे कार्यक्रम बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची येथील उपबाजारात शनिवारी (ता. २८) होणार आहे. सकाळी नऊ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

या प्रसंगी सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील, पणन राज्यमंत्री शंभूराजे देसाई, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, प्रकल्प संचालक (मॅग्नेट प्रकल्प) दीपक शिंदे, बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती वसंत गावडे व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मॅग्नेट प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रामध्ये सुमारे ११०० कोटीची कृषी क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. यात अस्तित्वातील व नवनिर्मिती शेतकरी उत्पादक संस्था निर्यातदार, प्रक्रियादार, संघटित किरकोळ विक्रेते, कृषी व्यवसाय करणारे लघु व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहाय्यता समूह यांच्या सहभागातून निवडण्यात आलेल्या फलोत्पादन पिकांचे उत्पादन, उत्पादकता व गुणवत्ता वाढविणे, काढणी पश्चात होणारे नुकसान कमी करणे व उत्पन्नात वाढविण्यासाठी या प्रकल्पाची आखणी केली आहे.

दै. नवराष्ट्र दि. २८।८।२०२१.
(बारामती आवृ-सी).

भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज भूमीपूजन

बारामती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे यांच्या वतीने मॅग्नेट प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या राज्यातील पहिल्या हाताळणी सुविधा केंद्राचे भूमीपूजन बारामती कृषि उत्पन्न बजार समितीचे उपबाजार जळोची येथे दि. २८ ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ९ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास मंत्री सहकार व पणन बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री पणन शंभूराजे देसाई, प्रधान सचिव सहकार व पणन अनुप कुमार, कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे सुनिल पवार, सरव्यवस्थापक कृषि पणन मंडळ तथा प्रकल्प संचालक मॅग्नेट प्रकल्प दिपक शिंदे, सभापती बारामती कृषि उत्पन्न बाजार समिती वसंत गावडे व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परिसरातील शेतकऱ्यांना फायदा

मॅग्नेट प्रकल्पाव्दारे महाराष्ट्रामध्ये सुमारे ११०० कोटीची कृषि क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये अस्तित्वात असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था ,निर्यातदार, प्रक्रीयादार, संघटीत किरकोळ विक्रेते, कृषि व्यवसाय करणारे लघु व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहाय्यता समूह यांच्या सहभागातून निवडण्यात आलेल्या फलोत्पादन पिकांचे उत्पादन, उत्पादकता व गुणवत्ता वाढविणे, काढणी पश्चात होणारे नुकसान कमी करणे व शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ करण्यासाठी या प्रकल्पाची आखणी करण्यात आली असून या सुविधा केंद्राचे उभारणीअंती राज्यातील व परिसरातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. या भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनिल पवार यांनी केले आहे.

दै. "पुढारी" दि. २८/८/२०२१.
(बारामती आवृत्ती)

बारामतीत राज्यातील पहिले फळे, भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र

उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज भूमिपूजन

बारामती : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील पहिले फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारात होत आहे. शनिवारी (दि. २८) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या केंद्राचे भूमिपूजन होणार आहे.

या कार्यक्रमाला सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, राज्यमंत्री शंभूराजे देसाई, सहकार व पणन विभागाचे अनुप कुमार, कार्यकारी संचालक सुनील पवार, सरव्यवस्थापक दीपक शिंदे, सभापती वसंत गावडे आदी उपस्थित राहणार आहेत. डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सिताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची व फुलपिके इत्यादी पिकांसाठी उत्पादन ते ग्राहकांपर्यंत वितरण अशा एकात्मिक मूल्य साखळ्यांचा विकास विचारात घेऊन राज्यात आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेट नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे. या प्रकल्पात शेतकरी उत्पादक संस्थांचा क्षमता विकास, मूल्य साखळी निर्माण करण्यासाठी अर्थसहाय्य देणे या घटकांचा समावेश असून निवड केलेल्या पिकांच्या मूल्य साखळी विकास अनुषंगाने राज्य कृषी पणन मंडळाच्या सुविधांचे विस्तारीकरण / आधुनिकीकरण करणे व नवीन सुविधांची उभारणी करणे याचा समावेश आहे. मॅग्नेट प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रामध्ये सुमारे ११०० कोटींची कृषी क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये अस्तित्वात असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था, निर्यातदार, प्रक्रियादार, संघटित किरकोळ विक्रेते, कृषी व्यवसाय करणारे लघू व मध्यम उद्योजक, वित्तीय संस्था, स्वयंसहाय्यता समूह यांच्या सहभागातून निवडण्यात आलेल्या फलोत्पादन पिकांचे उत्पादन, उत्पादकता व गुणवत्ता वाढविणे, काढणीपश्चात होणारे नुकसान कमी करणे व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी या प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे.

दै. "लोकमत" दि. २९/८/२०२१.

लोकमत

कोरोनामुळे राज्याच्या तिजोरीत दीड लाख कोटींची तूट : अजित पवार

बारामती येथे मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या प्रकल्पाचे भूमिपूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : राज्याच्या तिजोरीमध्ये दर वर्षी साडेचार लाख कोटी रुपये जमा होत असतात. दीड वर्षापासून असलेल्या कोरोना संकटामुळे राज्याच्या तिजोरीत दीड लाख कोटींची तूट आली आहे. परिणामी, विकासकामांसाठी निधीची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवू लागली आहे. मात्र, तरीही महाविकास आघाडी सरकार वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी योजना राबवून निधी देत आहे अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथे दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे भूमिपूजन शनिवारी (दि. २८) बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारामध्ये पार पडले. या वेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. या वेळी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील उपस्थित होते. पवार पुढे म्हणाले की, ज्येष्ठ नेते शरद पवार मुख्यमंत्री

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पणन मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

बाजार समितीच्या माध्यमातून पेट्रोल पंप, सीएनजी सेंटर उभे करण्यात येत आहे. जेणेकरुन बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी हा उद्देश आहे. तसेच सुपे येथे देखील नव्याने बाजार समितीच्या अंतर्गत पेट्रोलपंप उभारण्यात येत आहे. तर जळोची येथील जनावरे बाजार पुढील काळात तालुक्यातील झारगडवाडी येथे हलविण्यात येणार आहे. त्यासाठी २५ एकर जागा घेण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

डिझेलवर धावणाऱ्या एसटी बस घेणार नाही...

राज्यसरकार यापुढे डिझेलवर चालणाऱ्या एसटी बस घेणार नाही. सध्या इंधनटंचाईचे मोठे संकट एसटीवर आहे. त्यासाठी सीएनजी चालणाऱ्या व त्यानंतर इलेक्ट्रिक बस राज्यसरकार टप्प्याटप्प्याने घेणार आहे. एसटी महामंडळाकडे कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी पैसे नव्हते. काही दिवसांपूर्वी एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ५०० कोटी रुपये दिले आहेत, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत हा पहिला प्रकल्प बारामतीमध्ये उभारण्यात आला आहे.

तत्पूर्वी बाळासाहेब पाटील म्हणाले की, देशातील फळे निर्यातीमध्ये राज्यातील शेतकऱ्यांचा वाटा मोठा आहे. डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल) व फुलपिके आदींना जागतिक बाजारपेठेमध्ये

येथील शेतकऱ्यांना व्हावा या उद्देशाने हा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.

या वेळी सहकार व पणन प्रधान सचिव अनुप कुमार, कार्यकारी संचालक सुनील पवार, सरव्यवस्थापक व मॅग्नेटचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, सभापती समिती वसंत गावडे, नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, संभाजी होळकर, माळेगाव कारखान्याचे

दै. "लोकमत" दि. २९।८।२०२१.

लोकमत

कंटेनरच्या भाड्यामध्ये ८ ते १० पटीने वाढ

निर्यातीमध्ये समस्या : उपलब्धतेची माहिती देण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : निर्यातीसाठी कंटेनरची उपलब्धता खूपच कमी झाल्याने भाड्यामध्ये ८ ते १० पटीने वाढ झाली आहे. साधारणतः सहा महिन्यांपूर्वी परदेशात कंटेनर १००० ते १२०० डॉलरमध्ये जात होते. त्यांचे दर आता ८००० ते १२००० डॉलर पर्यंत झाले आहेत. त्यामुळे निर्यातीवर परिणाम झाल्याची भूमिका फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्रने (फाम) मांडल्याची माहिती वरिष्ठ उपाध्यक्ष राजेश शहा यांनी सांगितले.

वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी दिल्ली येथे देशातील ३५ वेगवेगळ्या व्यापारी व उद्योग संस्थेचे प्रत्येकी दोन प्रतिनिधी बैठकीसाठी बोलावले होते. राज्यमंत्री सोमप्रकाश व अनुप्रिया पटेल हे देखील उपस्थित होते. कंटेनरची मोनोपॉली देशात काही ठरावीक एजंटकडे आहे, असे सांगून कंटेनरची उपलब्धता ही इंटरनेटवर किंवा पोर्टलवर ओपन ठेवावी. म्हणजे प्रत्येक निर्यातदाराला कंटेनरची उपलब्धता आणि दर कळतील, अशी मागणी फामच्यावतीने करण्यात आली.

...तर निर्यातदारांना लाभ

- जगातील अनेक देशांत आपले दूतावास आहेत. त्या दूतावासांमधून त्या त्या देशांतील विक्रेता आणि खरेदीदार यांची माहिती एकमेकांच्या संपर्कामध्ये ठेवली तर देशातील निर्यातदारांना त्याचा फायदा होईल. यासाठी इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजि (IT) इन्फ्रास्ट्रचर उपलब्ध करावा.
- गोयल म्हणाले की, जुलैं मध्ये आपल्या देशातून साधारण ३६ बिलियन डॉलर निर्यात झाली आहे. या आर्थिक वर्षामध्ये ४०० बिलियन डॉलरची जगभरात आपली निर्यात होईल. स्टील, फार्मा या वस्तू अजून रोडरेपमध्ये अंतर्भूत नाहीत त्यांचा रोडरेपमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

बैठकीमध्ये देशातून निर्यात का कमी होते? निर्यात वाढ कशी होईल? सध्याच्या निर्यात धोरणात व्यापाऱ्यांना किंवा उद्योजकांना काय त्रास आहे यावर बरीच चर्चा झाली. सरकारने 'रोडरेप' (रेमिशन ऑफ ड्युटीज अँड टॅक्सेस ऑन एक्स्पोर्ट प्रॉडक्ट्स) चे दर वाढविण्याची विनंतीही फामने केली आहे. सध्या काही वस्तू रोडरेपमध्ये सामील नाहीत. त्या वस्तूंचाही समावेश करावा. रोडरेपमध्ये समाविष्ट वस्तूंचे दर वाढवले तर निर्यातदारांना त्याचा फायदा होईल आणि निर्यात वाढेल. रोडरेप म्हणजे सरकार निर्यातीवर काही प्रमाणात रेमिशन म्हणजे टॅक्स वरसूट देते.

दै. अग्रोवन दि. २९/८/२०२१.

शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प

उपमुख्यमंत्री अजित पवार : बारामतीतील शेतमाल हाताळणी सुविधा केंद्राचे भूमिपूजन

बारामती, जि. पुणे : राज्यातील शेतीमाल व फळांचे काढणीपश्चात होणारे नुकसान टाळून निर्यातीस चालना मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने दोन हजार कोटी रुपयांचा मॅग्नेट प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या शेतीमाल हाताळणी सुविधा केंद्राचे भूमिपूजन, बाजार समितीच्या वजनकाट्याचे उद्घाटन शनिवारी (ता. २८) पवार यांच्या हस्ते झाले. त्या प्रसंगी ते बोलत होते. पणनमंत्री बाळासाहेब पाटील, पणन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, पणन संचालक सतीश सोनी, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, प्रकल्प संचालक (मॅग्नेट प्रकल्प) दीपक शिंदे, नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, सभापती नीता फरांदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती वसंत गावडे, सचिव अरविंद जगताप आदी उपस्थित होते. मंत्री पवार म्हणाले, "शेतकऱ्याच्या शेतापासून ते ग्राहकांच्या दारापर्यंत शेतीमाल किंवा फळे जाईपर्यंत ६० टक्के नुकसान होते, काढणीपश्चात नुकसान प्रचंड असून ते टाळल्यास निर्यातीला चालना मिळेल व बाजारभावही चांगले मिळू शकतील.

बारामती, जि. पुणे : येथील मॅग्नेटअंतर्गत राज्यातील पहिल्या हाताळणी सुविधा केंद्राचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी (ता.२८) झाले. या वेळी पणनमंत्री बाळासाहेब पाटील व इतर मान्यवर.

नुकसानीच्या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी मॅग्नेट प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतला आहे. यात ७० टक्के निधी आशियायी विकास बँकेकडून कर्ज स्वरूपात उभारला जाणार असून, ३० टक्के निधी राज्य शासन देणार आहे. उच्च मूल्य देणाऱ्या बाजारपेठेत माल पाठविण्यातील अडचणी यातून दूर करण्याचा प्रयत्न होणार आहे.

दरम्यान, जागतिक बाजारपेठेत उच्च दर्जाचा माल जावा व त्याला उत्तम मूल्य मिळावे, असा या योजनेचा हेतू असल्याचे पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी नमूद केले. बारामतीत याचा पहिला प्रकल्प सुरू होत असून, पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना याचा उपयोग होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी अनुपकुमार यांनीही शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेतला, सुनील पवार यांनी प्रास्ताविक केले.

बारामतीच्या प्रकल्पाचा उद्देश

- डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची तसेच फुले पिकांच्या मूल्य साखळीमध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकरी उत्पन्न वाढविणे. फळे व भाजीपाल्याचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे व साठवणूक क्षमता वाढविणे
- मालाची मूल्यवृद्धी करणे व अन्नवितरण व्यवस्था कार्यक्षम करणे.
- शेतकरी उत्पादक संस्थांचा मूल्य साखळीतील सहभाग वाढविणे.

बारामतीच्या प्रकल्पाचे स्वरूप

- ७०० मेट्रिक टन क्षमतेचे शीतगृह, ● ३० मेट्रिक टन क्षमतेचे प्रशीतकरण केंद्र
- १२३३५ चौ.फुटांचे संकलन व प्रतवारी केंद्र
- ६९२१ चौ. फुटांचे डाळिंब प्रक्रिया केंद्र
- दोन मेट्रिक टन प्रति तास क्षमतेची द्राक्ष, केळी व डाळिंब हाताळणी यंत्रणा
- २५ मेट्रिक टन क्षमतेचे फ्रोजन फ्रूट स्टोअर
- ५ मेट्रिक टन प्रति बॅच क्षमतेचा ब्लास्ट फ्रीजर.
- वजन मापन व तात्पुरता साठवणूक कक्ष, पॅकिंग मटेरिअल साठवणूक कक्ष
- प्रयोगशाळा व माल आवक जावक स्वतंत्र विभाग.

दै. "लोकमत" दि. २९/८/२०२१.

कोरोनामुळे राज्याच्या तिजोरीत दीड लाख कोटींची तूट : अजित पवार

बारामती येथे मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या प्रकल्पाचे भूमिपूजन

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : राज्याच्या तिजोरीमध्ये दर वर्षी साडेचार लाख कोटी रुपये जमा होत असतात. दीड वर्षांपासून असलेल्या कोरोना संकटामुळे राज्याच्या तिजोरीत दीड लाख कोटींची तूट आली आहे. परिणामी, विकासकामांसाठी निधीची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवू लागली आहे. मात्र, तरीही महाविकास आघाडी सरकार वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी योजना राबवून निधी देत आहे अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथे दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे भूमिपूजन शनिवारी (दि. २८) बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारामध्ये पार पडले. या वेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. या वेळी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील उपस्थित होते. पवार पुढे म्हणाले की, ज्येष्ठ नेते शरद पवार मुख्यमंत्री असताना राज्यामध्ये फलोत्पादन योजना राबविण्यात आली. केंद्रीय कृषी मंत्रिपदाच्या कार्यकाळात हीच योजना शरद पवार यांनी राष्ट्रीय पातळीवर नेली. त्याचा परिणाम म्हणजे राज्यासह देशात फळांच्या उत्पादनात वाढ झाली. बारमाही फळे उपलब्ध झाली. मात्र कृषिमूल्य साखळीच्या दृष्टीने ४० टक्के, तर शेतकरी ते ग्राहक या प्रक्रियेमध्ये अजूनही फळे, भाजीपाला यांचे ६० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी राज्यभरात मॅग्नेट प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रामध्ये सुमारे १ हजार ५०० कोटींची कृषी क्षेत्रासाठी पायाभूत सविधांची उभारणी करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत हा पहिला प्रकल्प बारामतीमध्ये उभारण्यात आला आहे.

तत्पूर्वी बाळासाहेब पाटील म्हणाले की, देशातील फळे निर्यातीमध्ये राज्यातील शेतकऱ्यांचा वाटा मोठा आहे. डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल) व फुलपिके आदींना जागतिक बाजारपेठेमध्ये चांगली मागणी असते. काढणीपश्चात शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी व जागतिक बाजारपेठेतील चांगल्या दराचा फायदा येथील शेतकऱ्यांना व्हावा या उद्देशाने हा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.

या वेळी सहकार व पणन प्रधान सचिव अनुप कुमार, कार्यकारी संचालक सुनील पवार, सरव्यवस्थापक व मॅग्नेटचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, सभापती समिती वसंत गावडे, नगराध्यक्षा चीर्णिमा तावरे, संभाजी होळकर, माळेगाव कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब तावरे, छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत काटे यांच्यासह सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पणन मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार.

बाजार समितीच्या माध्यमातून पेट्रोल पंप, सीएनजी सेंटर उभे करण्यात येत आहे. जेणेकरून बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी हा उद्देश आहे. तसेच सुपे येथे देखील नव्याने बाजार समितीच्या अंतर्गत पेट्रोलपंप उभारण्यात येत आहे. तर जळोची येथील जनावरे बाजार पुढील काळात तालुक्यातील झारगडवाडी येथे हलविण्यात येणार आहे. त्यासाठी २५ एकर जागा घेण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

डिझेलवर धावणाचा एसटी बस घेणार नाही...

राज्यसरकार यापुढे डिझेलवर चालणाऱ्या एसटी बस घेणार नाही. सध्या इंधनटचाईचे मोठे संकट एसटीवर आहे. त्यासाठी सीएनजी चालणाऱ्या व त्यानंतर इलेक्ट्रिक बस राज्यसरकार टप्प्याटप्प्याने घेणार आहे. एसटी महामंडळाकडे कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी पैसे नव्हते. काही दिवसांपूर्वी एसटी महामंडळाला कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी ५०० कोटी रुपये दिले आहेत, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Aug 29, 2021

दै. "पुढारी" दि. २९।८।२०२१.

कोरोनामुळे राज्याला दीड लाख कोटींचा फटका

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

बारामती : पुढारी वृत्तसेवा

राज्याच्या तिजोरीत दरवर्षी साडेचार लाख कोटी रुपये जमा होतात. कोरोनामुळे यात दीड लाख कोटींची तूट आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली. तसेच, या कठीण स्थितीतही विकासकामांत खंड पडू नये, याची काळजी महाविकास आघाडी सरकार घेत आहे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या फळ व भाजीपाला हाताळणी केंद्राचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, सहकारचे प्रधान सचिव अनुप कुमार, संचालक सुनील पवार, सतीश सोनी, दीपक शिंदे, पौर्णिमा तावरे, नीता फरांदे, बाळासाहेब तावरे, प्रशांत काटे, संभाजी होळकर, सचिन सातव, समितीचे सभापती वसंत गावडे, उपसभापती दत्तात्रय सणस, सचिव अरविंद जगताप उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, ३८ कोटींच्या या प्रकल्पामुळे बारामतीसह आजूबाजूच्या शेतकऱ्यांचा शेतमाल थेट आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राष्ट्रीय फलोत्पादन योजना राबवली. त्यामुळे राज्यासह देशात फलोत्पादन वाढले. बारमाही फळे उपलब्ध झाली. परंतु, हाताळणीत आपण कमी पडतो. त्यामुळे शेतकरी ते ग्राहक या टप्प्यात ६० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. ते टाळण्यासाठी राज्यात १ हजार कोटी रुपये खर्चून जिल्ह्या-जिल्ह्यांत प्रकल्प उभे केले जात आहेत. त्यासाठी आशियाई विकास बँकेकडून ७००, तर शासनाकडून ३०० कोटी दिले जाणार आहेत. राज्यातील पहिला प्रकल्प बारामतीत होत असल्याचा आनंद आहे.

सहकारमंत्री पाटील म्हणाले, एकूण शेतमाल निर्यातीत राज्याचा वाटा मोठा आहे. तो वाढविण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावेल. राज्याच्या विविध भागांत असे प्रकल्प सुरू केले जातील. कोरोनाकाळात बाजार समित्या सुरू ठेवण्याचा प्रयत्न केल्यामुळे उत्पादित मालाला बाजारपेठ मिळू शकली. प्रास्ताविक सुनील पवार यांनी केले. सूत्रसंचालन अनिल सावळे पाटील यांनी केले.

सीएनजी, इलेक्ट्रिक बस घेऊ

राज्य शासन यापुढे डिझेलवरील एसटी बस घेणार नाही. इंधनटंचाईमुळे टप्प्याटप्प्याने सीएनजी, इलेक्ट्रिक बस घेतल्या जातील. महामंडळाची स्थिती बिकट असून पगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी ५०० कोटी रुपये शासनाने दिले आहेत, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

जनावरांचा बाजार झारगडवाडीला

बारामती बाजार समितीच्या जळोची उपबाजारातील जनावरांचा बाजार झारगडवाडीला हलविण्यात येणार आहे. त्यासाठी तेथे २५ एकर जागा घेतली आहे, अशी माहितीही अजित पवार यांनी दिली.

दै. "पुण्यनगरी" दि. २९।८।२०२१.

कोरोनाने राज्याच्या तिजोरीचे दीड लाख कोटींचे नुकसान : उपमुख्यमंत्री

राज्य कृषी पणन मंडळाच्या भाजीपाला हाताळणी केंद्राचे भूमिपूजन : राज्यातील विकास निर्धीबाबत अजित पवार यांनी दिली माहिती

। बारामती । प्रतिनिधी

राज्याच्या तिजोरीमध्ये दर वर्षी साडेचार लाख कोटी रुपये जमा होत असतात. मागील वर्षापासून असलेल्या कोरोना संकटामुळे राज्याच्या तिजोरीत दीड लाख कोटींची तूट झाली आहे. यामुळे विकासकामांसाठी निधीची मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवू लागली आहे. मात्र, तरीही महाविकास आघाडी सरकार वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी योजना राबवून निधी देत आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती येथे दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या मॅग्नेट प्रकल्पांतर्गत राज्यातील पहिल्या भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्राचे

बारामती : जळोची येथील कृषी उत्पन्न उपबाजार समितीच्या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार व इतर मान्यवर.

भूमिपूजन शनिवारी बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जळोची उपबाजारात पार पडले.

या वेळी पवार म्हणाले, ज्येष्ठ नेते शरद पवार मुख्यमंत्री असताना राज्यामध्ये फलोत्पादन योजना राबविण्यात आली. केंद्रीय कृषी मंत्रिपदाच्या कार्यकाळात हीच योजना पवारसाहेबांनी राष्ट्रीय पातळीवर नेली. त्याचा परिणाम म्हणजे राज्यासह देशात फळांच्या उत्पादनात वाढ झाली. बारमाही फळे उपलब्ध झाली. मात्र, कृषिमूल्य साखळीच्या टप्प्यात ४० टक्के तर शेतकरी ते ग्राहक या प्रक्रियेमध्ये अजूनही फळे, भाजीपाला यांचे ६० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासाठी राज्यभरात मॅग्नेट प्रकल्पाद्वारे महाराष्ट्रामध्ये सुमारे १ हजार १०० कोटींची कृषी क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत हा पहिला प्रकल्प बारामतीमध्ये उभारण्यात आला आहे. तत्पूर्वी, सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील बोलताना म्हणाले, देशातील फळे निर्यातीमध्ये राज्यातील शेतकऱ्यांचा वाटा मोठा आहे. डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी, मिरची (हिरवी व लाल) व फूलपिके आदींना जागतिक बाजारपेठेमध्ये चांगली मागणी असते. काढणीपश्चात शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी व जागतिक बाजारपेठेतील चांगल्या दराचा फायदा येथील शेतकऱ्यांना व्हावा या उद्देशाने हा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. या वेळी सहकार व पणन प्रधान सचिव अनुप कुमार, कार्यकारी संचालक सुनील पवार, सरव्यवस्थापक व मॅग्नेटचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, सभापती वसंत गावडे, नगराध्यक्षा पौर्णिमा तावरे, संभाजी होळकर, माळेगाव कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब तावरे, छत्रपती कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत काटे उपस्थित होते.

पेट्रोल पंपाची उभारणी

बाजार समितीच्या माध्यमातून पेट्रोल पंप, सीएनजी सेंटर उभे करण्यात येत आहे. जेणेकरून बाजार समितीच्या उत्पन्नामध्ये वाढ व्हावी हा उद्देश आहे. तसेच सुपे येथेदेखील नव्याने बाजार समितीच्या अंतर्गत पेट्रोलपंप उभारण्यात येत आहे. तर, जळोची येथील जनावरे बाजार पुढील काळात तालुक्यातील झारगडवाडी येथे हलविण्यात येणार आहे. त्यासाठी २५ एकर जागा घेण्यात आली आहे, अशी माहिती पवार यांनी दिली.

दै. "लोकमत" दि. 30/8/2021. (ग्रामीण आवृत्ती)

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये 'मॅग्नेट' प्रकल्प उभारणार

आशियाई बँकेच्या सहकार्याने १ हजार कोटींचा निधी होणार उपलब्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

बारामती : राज्यात मोठ्याप्रमाणावर फळबाग आहेत. त्या माध्यमातून मोठे उत्पादन घेतले जाते. मात्र, कृषिमूल्य साखळीमध्ये, तसेच 'शेतकरी ते ग्राहक' या प्रक्रियेमध्ये शेतमालाचे ६० टक्क्यांपर्यंत नुकसान होते. त्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये २०२०-२१ ते २०२६-२७ पर्यंत मॅग्नेट प्रकल्पांतर्गत फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. आशियाई बँकेच्या सहकार्याने या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्यात येणार आहे. एकूण १ हजार कोटींचा हा प्रकल्प असल्याची माहिती पणन विभागाने दिली.

मॅग्नेट प्रकल्पांतर्गत बारामतीमध्ये पहिले फळे भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र साकारण्यात येणार आहे. राज्यात सुमारे ५८१ शीतगृहे आहे. तसेच, पूर्व शीतकरण आणि शीतगृह सुविधांयुक्त २०० पॅक हाऊस आहेत. परंतू पायाभूत सुविधांची एकूण क्षमता आणि विभागवार उपलब्धता यामध्ये असमतोल आहे. 'मॅग्नेट' प्रकल्पांतर्गत कृषिक्षेत्रात एक हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. आशियाई विकास बँक ७०० कोटी रुपये कर्ज स्वरूपात, तर राज्य शासन ३०० कोटी रुपये गुंतवणूक करणार आहे. या प्रकल्पांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात कृषिक्षेत्रासाठी पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेल्या शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी या प्रकल्पाची मदत होणार आहे. फळे व भाजीपाल्याचे जवळपास ४० टक्के नुकसान कृषिमूल्य साखळीच्या विविध टप्प्यामध्ये होते. एकूण नुकसानीपैकी ६० टक्के नुकसान हे प्रामुख्याने शेतापासून ग्राहकांपर्यंत शेतमाल पोहोचेपर्यंत होते. शेतापासून शेतमाल ग्राहकांपर्यंत पोहोचेपर्यंत होणारे नुकसान हे योग्य काढणीपश्चात हाताळणी व कृषिमूल्य साखळीमधील सुविधा यामध्ये प्रामुख्याने साठवण व शीतसाखळी सुविधांच्या माध्यमातून कमी करता येऊ शकते.



असा आहे बारामतीत साकारणारा प्रकल्प...

- प्रकल्पाची एकूण किमत: ४२.८३ कोटी
- प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या सुविधा...
- शीतगृह ७०० मे. टन (प्रत्येकी १०० मे.टनाचे सात),
- प्रशीतकरण ३०मे.टन(प्रत्येकी १० मे.टनाचे तीन),
- संकलन व प्रतवारी केंद्र १२ हजार ३३५ चौ. फूट
- डाळिंब प्रक्रिया केंद्र ६ हजार १२१ चौ. फूट
- हाताळणी यंत्रणा द्राक्षे २ मे.टन प्रति तास,केळी २ मे.टन प्रति तास, डाळिंब १.५ मे.टन प्रति तास
- फ्रोजन फ्रूट स्टोअर २५ मे.टन, ब्लास्ट फ्रिजर ५ मे.टन प्रति बॅच.

महाराष्ट्रातील फळांसाठी जागतिक ब्रँड तयार करा : अजित पवार

महाराष्ट्रामध्ये देशाच्या एकूण ११ टक्के फळांचे उत्पादन होते. पणन मंडळाने राज्यातील उत्पादित फळांसाठी जागतिक दर्जाचा ब्रँड तयार करावा जेणेकरून शेतकऱ्याला जागतिक बाजारपेठेतील दराचा फायदा होईल, अशी सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली.

प्रकल्पाचा मुख्य उद्देश

- राज्यातील डाळिंब, केळी, सत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, चिकू, स्ट्रॉबेरी, भेंडी व मिरची (हिरवी व लाल) व फुलपिके पिकाच्या मूल्यसाखळ्यामध्ये खासगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांचे उत्पन्नात वाढ करणे.
- फळे व भाजीपाल्याचे काढणी-पश्चात नुकसान कमी करणे व त्यांची साठवणूक क्षमता वाढविणे.
- मागणीनुसार मालाची मूल्यवृद्धी करणे तसेच अन्नाची वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे.
- शेतकरी उत्पादक संस्थाचा मूल्य-साखळीतील सहभाग वाढविणे.

ORO

दै. "अग्रोवन" दि. ३१/८/२०२१.

शेतमाल साखळीसाठी 'ऑपरेशन ग्रीन'

केंद्र सरकारतर्फे ५०० कोटी निधीची तरतूद

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : कोरोना संकटात विस्कळित झालेल्या शेतमाल पुरवठा साखळीला बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने वाहतूक आणि साठवणुकीसाठी 'ऑपरेशन ग्रीन' अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत एका लाभार्थ्याला जास्तीत जास्त १ कोटींचे अनुदान मिळणार आहे. तर वाहतूक आणि साठवणुकीसाठीच्या खर्चाच्या ५० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळणार आहे. पान ४ वर »

नोंदणी बंधनकारक

लाभार्थ्यांनि प्रथम ऑनलाइन पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. प्रत्येक लाभार्थ्यास योजना कालावधीमध्ये कमाल एक कोटी रुपयांपर्यंत लाभ घेता येईल. सदर योजनेत प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर पर्यंत आहे.

हे घेऊ शकतात लाभ

वैयक्तिक शेतकरी, कृषी - पणन फेडरेशन संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, कंपन्या, प्रक्रियादार, सेवा पुरवठादार, निर्यातदार आणि कमिशन एजंट, आदी प्रस्ताव ऑनलाइन नोंदणीसाठी केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या www.sampada-mofpi.gov.in/Login.aspx या वेबसाइट ला भेट द्यावी.

शेतमाल साखळीसाठी 'ऑपरेशन ग्रीन'

» पान १ वरून

केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने आत्मनिर्भर भारतअभियानाच्या माध्यमातून 'ऑपरेशन ग्रीन' योजनेंतर्गत टोमॅटो, कांदा व बटाटा या पिकांसह इतर फळे व भाजीपाला पिकांच्या एकात्मिक मूल्यसाखळी विकास योजना आखण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने ५०० कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. या योजनेद्वारे प्रामुख्याने किंमत स्थिरीकरण निधी (अंशकालीन) आणि एकात्मिक मूल्यसाखळी विकासासाठी पायाभूत सुविधांची उभारणी (दीर्घकालीन) करणे आदींचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील वैयक्तिक शेतकरी, कृषी - पणन फेडरेशन संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, कंपन्या, प्रक्रियादार, सेवा पुरवठादार, निर्यातदार आणि कमिशन एजंट इ. लाभार्थी योजनेचा लाभ घेऊ शकणार आहे.

या पिकांसाठी आहे योजना

ऑपरेशन ग्रीन योजनेंतर्गत कृषिमालाच्या उत्पादन क्षेत्रापासून ग्राहक बाजारपेठेपर्यंत वाहतूक आणि साठवणुकीसाठी प्रत्येकी ५० टक्के अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आंबा, केळी, पेरू, किवी, लिची, पपई, लिंबू, अननस, डाळिंब, फणस तसेच घेवडा, कारले, वांगी, ढोबळी मिरची, गाजर, फ्लॉवर, हिरवी मिरची, भेंडी, कांदा, बटाटा आणि टोमॅटो इ. फळे व भाजीपाल्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

खरेदीमालाचे किमान पात्र वजन

- शेतकरी उत्पादक कंपनी, संस्था, सहकारी संस्था, वैयक्तिक शेतकरी - १०० टन
- प्रक्रियादार, निर्यातदार, कमिशन एजंट - ५०० टन
- रिटेल कंपनी, स्टेट मार्केटिंग/को-ऑपरेटिव्ह फेडरेशन १००० टन

वाहतुकीसाठी किमान पात्र अंतर

- शेतकरी उत्पादक कंपनी / संस्था, सहकारी संस्था, वैयक्तिक शेतकरी, प्रक्रियादार, निर्यातदार, कमिशन एजंट - १०० कि.मी.
- रिटेल कंपनी, स्टेट मार्केटिंग / को-ऑपरेटिव्ह फेडरेशन - २५० कि.मी.

"कोरोना संकटात देशात सर्वत्र फळे व भाजीपाला पुरवठा साखळी विस्कळित झाली आहे. उत्पादक शेतकऱ्यांनी पिकविलेला कृषिमाल ग्राहकांपर्यंत पोहचविणे सुकर होऊन कृषिमालाच्या काढणीपश्चात हाताळणी अभावी नुकसान कमी करणे आवश्यक आहे यासाठी ऑपरेशन ग्रीन राबविण्यात येत आहे. याद्वारे राज्यातील कांदा, टोमॅटो व इतर शेतमाल देशाचे इतर भागात विक्रीसाठी गेल्यास बाजार भावात सुधारणा होण्यास मदत होणार आहे.

– सुनील पवार, कार्यकारी संचालक, राज्य कृषी मंडळ

अनुदानासाठी निश्चित करण्यात आलेले वाहतूक भाडे

ट्रक - २ रुपये ८४ पैसे प्रति टन प्रति कि.मी. शितवाहन - ५ रुपये प्रति टन प्रति कि.मी अनुदानासाठी निश्चित करण्यात साठवणूक भाडे गोदाम साठवणूक दर ३४५ रुपये प्रति टन प्रति हंगाम शीतगृह साठवणूक २ हजार रुप. प्रति टन प्रति हंगाम